महाराष्ट्र शिक्षण सेवा, (प्रशासन शाखा) मधील शिक्षण उपसंचालक व समकक्ष, गट-अ या पदावर पदोन्नती देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांक: निसूची-३६१८/प्र.क्र.१७/प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २ ऑगस्ट, २०१९

वाचा-१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३१०/कार्या.१२, दिनांक १५.१२.२०१७ व त्यामधील सुधारणेचा शासन निर्णय दिनांक ३०.०८.२०१८
२. शा.शि. व क्री. विभाग, शासन निर्णय क्रमांक: निसूची-३६१८/प्र.क्र.५/प्रशा-२, दिनांक १२.०९.२०१८ व १३.११.२०१८
३. शा.शि. व क्री. विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक : निसूची-३६१८/प्र.क्र.१७/प्रशा-२, दिनांक १५ .१०.२०१८

प्रस्तावना :

महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशासन शाखा) गट-अ मधील शिक्षण उपसंचालक व तत्सम संवर्गातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदांवर निवडसूची २०१७-१८ मध्ये पदोन्नती देण्याकरीता प्रधान सचिव (शालेय शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय पदोन्नती समितीची बैठक दि.३१.५.२०१८ रोजी पार पडली. सदर बैठकीमध्ये शिक्षणाधिकारी संवर्गामधून शिक्षण उपसंचालक (प्रशासन शाखा) पदावर पदोन्नती देण्याकरीता पात्र-अपात्रता ठरविण्यात आली होती. त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाची निवडसूचीस मान्यता घेतल्यानंतर व महसूल विभाग वाटप नियमानुसार नागरी सेवा मंडळाच्या शिफारशीस मान्यता घेऊन नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेनंतर पदोन्नतीचे आदेश दिनांक १२.०९.२०१८ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. तद्नंतर श्री. आवारी यांच्या पदोन्नतीचे आदेश दिनांक १३.११.२०१८ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. निवडसूचीतील अन्य एक अधिकारी श्री. सत्यवान ध. सोनवणे यांना महसूल विभाग संवर्ग नियमानुसार महसूली विभाग वाटप करुन त्यास नियुक्ती प्राधिकारी यांची मान्यता घेण्यात आली होती. पदोन्नतीची प्रक्रिया सुरु असतानाच, श्री.सत्यवान सोनवणे, शिक्षणाधिकारी (मा.) जि.प.सोलापूर हे सदर पदावर दि.०१.०२.२०१६ ते २९.०५.२०१८ या कालावधीत कार्यरत असताना विभागीय चौकशी प्रकरणामध्ये सादरकर्ता अधिकारी या नात्याने कर्तव्यात कसूर केल्याबाबत त्यांच्याविरुध्द तयार करण्यात आलेल्या दोषारोपातील, बाबींच्या पुष्ट्यर्थ असलेल्या गैरशिस्तीच्या किंवा गैरर्तणूकीबाबत क्र.विचौअ-१२१८/प्र.क्र.१०६/प्रशा-३, दि.३०.७.२०१८ अन्वये नियम १० खाली दोषारोपपत्र बजावण्यात आले होते. सबब, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १५.१२.२०१७ च्या शासन निर्णय परिच्छेद १ मधील अ.क्र.५ नुसार श्री. सत्यवान ध. सोनवणे यांचे पदोन्नती समितीने केलेले मूल्यमापन व प्रतवारी स्वतंत्र पाकीटात मोहोरबंद करुन ठेवण्यात आले होते.

२. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १५.१२.२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीनंतर शिस्तभंगविषयक कार्यवाहीचे ६ महिन्यांनी पुर्नविलोकन करणे आवश्यक असल्याने, श्री. सत्यवान सोनवणे यांच्याविरुध्द म.ना.से. (शिस्त व

अपील) नियम, १९७९ च्या नियम १० अन्वये सुरु करण्यात आलेल्या विभागीय चौकशीत श्री.सोनवणे यांचा खुलासा मान्य करण्यात येऊन, त्यांची विभागीय चौकशी बंद करण्यात आली आहे. श्री.सोनवणे यांच्या विरुध्द सद्य:स्थितीत शिस्तभंग विषयक कार्यवाही संपुष्टात आली असल्याने त्यांच्या पदोन्नतीबाबत विभागीय पदोन्नती समितीने दिनांक ३१.०५.२०१८ रोजी घेतलेल्या निर्णयाचा मोहोरबंद लिफाफा समितीपुढे उघडण्यात आला असून, त्यामध्ये श्री.सत्यवान सोनवणे यांना उपसंचालक व समकक्ष पदावरील पदोन्नतीस पात्र ठरविण्यात आले आहे. सबब, श्री. सत्यवान सोनावणे यांना पदोन्नती देण्याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशासन शाखा), गट- अ मधील शिक्षणाधिकारी पदावर कार्यरत असणाऱ्या खाली नमूद अधिकाऱ्यांना शासनाने मान्य केलेल्या निवडसूचीनुसार शिक्षण उपसंचालक व समकक्ष, महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशासन शाखा) गट-अ या पदावर सहाव्या वेतन आयोगानुसार रु.१५६००-३९१०० (ग्रेड पे रु.६६००/-) या वेतन संरचनेत ज्येष्ठतेनुसार व गुणवत्तेनुसार खुल्या प्रवर्गात रिक्त असलेल्या पदांवर निम्न अटींच्या अधीन राहून खालील कोष्टकात नमूद स्तंभ क्र. ७ येथे नमूद पदावर तात्पुरती पदोन्नती देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

अ. क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	जातीचा प्रवर्ग	ज्येष्टता सूचीतील क्रमांक	अभिप्राय	महसूली विभाग	पदोन्नतीच्या पदावरील पदस्थापना
१	२	३	४	५	६	७
१	श्री. सत्यवान धर्मा सोनावणे	खुला	१६/२०१४	खुल्या प्रवर्गातून पात्र	पुणे	विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

२. श्री. सत्यवान सोनावणे हे शिक्षण उपसंचालक संवर्गात दिलेल्या पदोन्नतीच्या पदावर विहीत मुदतीत रुजू झाल्यास, त्यांना त्यांच्या कनिष्ठ अधिकाऱ्यांचा म्हणजेच श्री. सुरेश मा. आवारी यांच्या पदोन्नतीचा दिनांक १२.०९.२०१८ हा मानीव दिनांक देण्यात यावा.

३. अटी-

(१) पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाज्येष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ च्या अधिन राहून भरण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग / १६ ब यांनी दिनांक २९.१२.२०१७ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांनुसार सदर मान्यता देण्यात येत आहे.

(२) सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील अधिकाऱ्यांना नियमितपणाचा व सेवाज्येष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.

(३) निवडसूचीतील अधिकाऱ्यांच्याविरूध्द विभागीय चौकशी सुरू असेल त्यांच्याबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक १५.१२.२०१७ व दिनांक ३०.०८.२०१८ मधील तरतुदी लागू राहतील. त्यानुसार श्री. सोनावणे हे पदोन्नतीच्या पदावर रुजू होईपर्यंत त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरु झाल्यास अथवा फौजदारी खटला दाखल झाल्यास पदस्थापनेच्या ठिकाणी त्यांना रुजू करुन घेण्यात येऊ नये.

(४) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २.०६.२०१४ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार संबंधीत अधिकाऱ्यांनी मत्ता व दायित्व विवरणपत्र केल्याची खात्री करून श्री. सोनावणे यांचे कार्यमुक्तीचे आदेश आयुक्त (शिक्षण) यांनी निर्गमित करावे.

(५) सदर पदोन्नतीनुसार संबंधित अधिकाऱ्यास देण्यात आलेली पदस्थापना सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दि.२८.०४.२०१५ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणेनुसार महसूल विभाग संवर्ग वाटपाच्या तरतुदीनुसार करण्यात आली आहे.

४. आयुक्त (शिक्षण), पुणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांस पदोन्नतीच्या ठिकाणी रुजू होण्याकरीता तात्काळ कार्यमुक्त करण्याची कार्यवाही करावी. तसेच संबंधित अधिकारी यांनी पदोन्नती आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत पदोन्नतीच्या पदावर रुजू व्हावे व संबंधित अधिकारी रुजू झाल्याचा दिनांक आयुक्त (शिक्षण) यांनी शासनास कळवावा.

५. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१९०८०२१६१५५११४२१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

Santosh Basaveshwar Mamadapure

Digitally signed by Santosh Basaveshwar Mamadapure
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3bfe111652996d95372924b1d22cdf88b33dfa2a3de3d8ea011b7d83adc40cb6, serialNumber=557abe7a7194ec5ddc74df537d7d57a9dbda20b1937a2e41983c35f6a38b6ad8, cn=Santosh Basaveshwar Mamadapure
Date: 2019.08.02 16:29:24 +05'30'

(सं.ब.ममदापुरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त (शिक्षण), पुणे
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. उस्मानाबाद / कोल्हापूर.
३) महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
४) महालेखाकार (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
५) सर्व संचालक
६) विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर / लातूर
७) जिल्हा कोषागार अधिकारी, उस्मानाबाद /कोल्हापूर
८) संबंधित अधिकारी (आयुक्त कार्यालयामार्फत)

प्रत माहितीस्तव-

१) मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
२) अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
३) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राद्वारे)
४) अवर सचिव (प्रशा.३), शालेय शिक्षण व क्रीडा, मंत्रालय, मुंबई
५) निवडनस्ती